| Special Issue No.18 | विषय<br>संत साहित्याचे सामाजिक योगदान | ISSN 2349-638x<br>Impact Factor 4.574 |
| --- | --- | --- |

गेल्या सातशे वर्षातील मराठी वाङ्मयाच्या इतिहासाचे अवलोकन केले तर जाणवते की, संत साहित्याची एवढी लोकप्रियता अन्य कोणत्याच वाङ्मय प्रकाराला लाभलेली नाही. ज्ञानेश्वरी, तुकारामाची गाथा आदि ग्रंथांची संपादने व पुनर्मुद्रणे मोठया प्रमाणात झालेली आहेत. मराठी संतांचे कार्य हे केवळ सांप्रदायिक स्वरूपाचे नाही तर ती एक व्यापक चळवळ आहे. शैव, नाथ, दत्त, चैतन्य, आनंद, सुफी आदि पंथातील भक्तजनांना सामावून घेणारे ते सर्वसमावेशक उपासनापीठ होते. संतांच्या कार्याची प्रेरणा धार्मिक प्रबोधनाची होती. संत ज्ञानेश्वर आणि संत नामदेव हे पंढरपूरच्या संतसंप्रदायाचे आद्य प्रवर्तक आहेत. सर्वसामान्य व्यक्ती, कनिष्ठ जातीत जन्मलेला व विद्या आणि संस्कृती या पासून पिढ्यानपिढ्या वंचित असलेला माणूस हाच संतांच्या प्रबोधन चळवळीचा केंद्रबिंदू होता. हा संप्रदाय सर्वात अधिक लोकप्रिय झाला. या संप्रदायाचे प्रवेशद्वार सर्व जातींच्या व पंथाच्या स्त्री–पुरूषांना खुले होते. भक्तीच्या मेळाव्यात कुणी लहान नाही, कुणी मोठा नाही. सर्व माणसे एकाच जगन्माऊलीची लेकरे आहेत अशी संत संप्रदायाची शिकवण होती. संत नामदेव व संत तुकाराम आदि संतांनी स्वातंत्र्याचे व समतेचे वातावरण मोठया प्रमाणात निर्माणस केले होते. या संप्रदायात कुणबी, माळी, शिंपी, सोनार, तेली, कुंभार, महार, ब्राह्मण अशा अनेकजातींचे लोक होतेच पण ख्रिस्ती आणि मुसलमान संतही होते.

संत ज्ञानदेवांनी भागवत धर्माची पायाभरणी केली. ज्ञानदेवानंतर संत नामदेव, जनाबाई, एकनाथ, रामदास, तुकोबाराय, निळोबाराय आदि संतांनी आपापल्या वाङ्मयाबरोबर भारूडेही लिहिली. तत्कालीन समाजरचनेत आढळणाऱ्या गारूडी, फकीर, वैरागी, जागल्या, भटीण, कोल्हाटीण, जोशी, दरवेशी, महारीण, जंगम, वैदू आदि मानवी भूमिकांबरोबरच टिटवी, पिंगळा, बुलबुल, वटवाघूळ, काऊ, मैना, विंचू, एडका, नंदीबैल, गाय इ. प्राणी व पक्ष्यांच्या भूमिकाही भारूडात दिसतात. हुतुतु, हमामा, भोवरा, पिंगा, फुगडी, विटीदांडू आदि खेळांच्या प्रतीकात्मक भूमिकांमधूनही भारूडे लिहिली गेली. भारूड हे समाजमनाचा वेध घेणारा लोकप्रिय वाङ्मयप्रकार म्हणून ओळखला जातो. मराठी भाषेत भारूडांचे लेखन मोठया प्रमाणात झालेले आहे. रूपकात्मक पध्दतीची ही भारूडरचना अन्य भाषांमध्ये जाणवत नाही.

'भारूड' या शब्दाचा प्रचार पुरातन आहे. अनेकांनी या शब्दाचे मुळ शोधण्याचा प्रयत्न केला. तरीदेखील संत एकनाथांच्या लेखनापासूनच मराठीमध्ये या प्रकाराला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. समाजाला जागृत करण्याचे सामर्थ्य लोकवाङ्मयात आहे. भारूडे, लावण्या, पोवाडे या वाङ्मय प्रकारांनी समाजजागृतीचे काम केले आहे. त्यातही भारूडे हा प्रकार प्रभावी ठरला आहे. भारूडांमध्ये विषयांची विविधता, नाटयगुण, रूपके, गेयता आणि प्रबोधनात्मक विचार मांडलेला असल्याने लोकशिक्षणाचे महत्वाचे कार्य भारूडांनी केले आहे. आजही ग्रामीण भागात भारूड आणि ळळीत हा प्रकार बऱ्यापैकी आढळतो. देहू, आळंदी, पंढरपूर वारीवेळी असंख्य भाविक दिंडीसोबत चालत चालत जातात. अशा वारीमध्ये भारूडांचे सादरीकरण मोठया प्रमाणवर घडते. एखादया रूपकाच्या माध्यमातून अध्यात्म सांगण्याचा हेतूही भारूडात असतो.

मराठी भाषेत भारूडाचे लेखन बऱ्यापैकी झाले आहे. संत ज्ञानेश्वरांनी कमी भारूडे लिहली असली तरीही मराठी भाषेतील भारूड वाङ्मयाचे आद्य रचनाकार म्हणून संत ज्ञानेश्वरांचे नाव घ्यावे लागते. संत ज्ञानदेवांनी भारूड रचनाप्रकाराच्या मंदिराचा पाया घातला आणि संत नामदेव, बहिणाबाई, चोखामेळा, जनाबाई, भानुदास, निळोबाराय या सर्व संतांनी हा रचनाप्रकार हाताळला. या वाङ्मय प्रकाराचे शिखर होण्याचे भाग्य संत एकनाथांना जाते. वारकरी संप्रदायासोबतच महानुभाव, समर्थ, दत्त, नाथ, नागेश, जैन या संप्रदायातही थोडयाफार प्रमाणात भारूडाचे लेखन

झालेले आहे. संत ज्ञानदेवांनी सुरू केलेला हा वाङ्मय प्रकार अनेक संतांनी व संप्रदायांनी हाताळला आणि भारूडांची निर्मिती केली.

भारूडाचा उद्देश हा मुख्यत: बहुजन समाजाला रंजनासोबतच प्रबोधन, तत्वज्ञान सांगणे असा आहे. त्यामुळे भारूडातील सर्वच विषय हे बहुजनांच्या परिचयाचे व व्यवहारात नेहमी आढळणारे असे आहेत. आजूबाजूच्या जीवनातून भारूडांचे विषय निवडलेले आहेत त्यामुळे सोप्या भाषेत मन रिझवणारी भारूडे पसंतीस उतरली आहेत. सभोवतालच्या सर्व स्तरातून भारूडाचे विषय निवडलेले आहेत. त्यामध्ये संगीतवाले, फकीरी कारभार, परमेश्वराची वेगवेगळी रूपे, आध्यात्मिक विषय, खेळ, स्त्रीजीवन, सण, कुटुंबविषयक, भक्तिविषयक, पशु, पक्षीलीला वर्णन, प्रबोधनपर अशा अनेकानेक विषयांवर भारूडांचे लेखन झालेले आहे. विषयांची विविधता मोठ्या प्रमाणात लाभली आहे. त्यामुळेच भारूड हा वाङ्मयप्रकार प्रत्येकांना आपलासा वाटू लागला आहे. सामान्य लोकांमधील संतांचे निरिक्षण किती विलक्षण असते याचा प्रत्यय भारूड लेखनाद्वारे लक्षात येतो. अशा या भारूड लेखनाला शिखरावर पोहोचवण्याचे काम संत एकनाथांनी केले. कारण भारूड म्हटले की, लगेच संत एकनाथांचे नाव समोर येते. संख्येच्या व विषय वैविध्याच्या दृष्टीनेही संत एकनाथांचे नाव अग्रक्रमांकाने पुढे येत.

लोकसंस्कृतीचे उपासक म्हणून व समाजातील बहुजनांचे मनोरंजन व प्रबोधन करणारा खूप मोठा वर्ग महाराष्ट्रामध्ये आहे. या वर्गात गोंधळी, भराडी, वाघ्या, मुरळी, वासुदेव, जोशी, जागल्या अशा साऱ्यांचा उल्लेख करता येईल. अगदी तशीच परंतु अधिक व्यापक भूमिका घेऊन संत एकनाथांनी परमार्थासाठी भारूडाचा उत्तम उपयोग केलेला आहे. रूपकसृष्टीतील एक मोठा विषय म्हणून एकनाथांच्या भारूडामध्ये पाहिले जाते. त्यांच्याएवढे सुंदर रूपक मराठीत विरळ जाणवते. एकनाथांच्या भारूडाविषयी डॉ. यु.म.पठाण म्हणतात की, ''संत एकनाथ हे एक श्रेष्ठ लोकशिक्षक होते, समाजशिक्षक होते. ततलीन समाजाच्या स्थितीचे त्यांनी सुक्ष्म अध्यनन केले आहे ते अध्ययन विविधांगी व बहुरंगी होते''. एकनाथांच्या भारूडांचे विषय बहुविध आहेत. शिवाय सर्वसामान्य बहुजनांच्या अनुभवविश्वाचे दर्शन लेखनात दिसते. संत एकनाथांनी हे सर्वसामान्यांचे अनुभवविश्व अंगिकारले. त्यामुळेच भारूडाची लोकप्रियता वाढीस आली.

संत एकनाथांनी चतु:श्लोकी भागवत, एकनाथी भागवत, रूक्मिणी स्वयंवर, भावार्थ रामायण आदि ग्रंथांची रचना विद्वानांसाठी झालेली होती. सर्वसामान्य बहुजनांना या ग्रंथाचे तत्वज्ञान समजण्यास कठीण जात होते. त्यामुळे भोळया भाविक समाजाला त्यांच्याच भाषेत आकलन होईल याकरिता भारूडांचा उपयोग करण्यात आला. समाजाला कळणारी भाषा आणि पेलणारे तत्वज्ञान भारूडात आहे. तत्कालीन समाजरचना एकनाथांना भारूडनिर्मितीसाठी उपयोगी ठरली. एकनाथकालीन सामाजिक स्थिती ढासळली होती. संत एकनाथ हे जसे संत होते तसेच ते समाजसुधारकही होते. सत्प्रवृत्ती आणि अध्यात्मापासून दूर गेलेल्या समाजाला सुधारण्यासाठी समाजाच्याच भाषेत तत्वज्ञान सांगण्याच्या हेतूने लोकशिक्षण आणि आध्यात्मिक प्रबोधनही भूमिका ठेवून एकनाथांनी भारूडांची रचना केली.

मराठीमध्ये सर्वात जास्त भारूडे संत एकनाथांनी लिहिली. जवळपास १५० विषयावर ३३४ च्या आसपास एकनाथांची भारूडे आढळतात. संत एकनाथांवर ज्या तत्वज्ञानावर प्रभाव पडला, जी अनुभूती आली, त्याचेच प्रतिबिंब त्यांच्या भारूडावर पडलेले दिसते. नाथांच्या भारूडात विषयांची आणि रूपकांची विविधता आहे. या भारूडात नाटय आहे, चमत्कार आहे, विपरित वाटेल अशी नवलाईची कथने आहेत. याशिवाय कुटे, कोडी देखील आहेत. सर्वसामान्य बहुजनांसाठी लिहिली गेलेली ही सामाजिक आशयाची भारूडे आहेत. सुशिक्षित आणि विद्वान लोकांसाठी काही कुटे

लिहिली आहेत. संत एकनाथांच्या भारूडातून सांगितलेले अध्यात्म लक्षात घेता त्यांच्या भारूडांचे वर्गीकरण डॉ. रामचंद्र देखणे यांनी 'भारूड वाङ्.मयातील तत्वज्ञान' या ग्रंथात केलेले आहे ते पुढीलप्रमाणे –

अ) मानवी भूमिका दर्शविणारी भारूडे :– याचे सात उपप्रकारात वर्गीकरण केले आहे.

१) प्रबोधनात्मक मानवी भूमिका सांगणारी भारूडे उदा :– वासुदेव, वाघ्या, जोशी,कोल्हाटी इ.
२) जाती व्यवसाय दर्शविणारी भारूडे उदा :– भटीण, महारीण, माळी इ.
३) शारीरिक व्यंगात्मक भारूडे उदा :– मुका, पांगळा, आंधळा इ.
४) सौरी व्यवसायात्मक भारूडे उदा :– सौरी, कुंटीण, जगजोडी इ.
५) नाती गोती सांगणारी भारूडे उदा :– दादला, बायला इ.
६) सामाजिक वृत्तीदर्शक भारूडे उदा :– चोपदार, जागल्या इ.
७) गावगुंडी विषयावरील भारूडे उदा :– गावगुंड, आडबंग इ.

ब) दैवी भूमिका व भूत पिशाच्चविषयक भारूडे :– महालक्ष्मी, जोगवा, भूत, कान्होबा इ.
क) पशु –पक्षीविषयक भारूडे उदा:– गाय, विंनू, एडका, पोपट इ.
ड) कुटे–कोडी नवलविषयक भारूडे उदा :– कोडे, नवलाई इ.
इ) खेळ, सण व उत्सवविषयक भारूडे उदा :– होळी, हळदुळी, शिमगा इ.
फ) जोहार–दरबारी पत्रे व दरबारी विषयावरील भारूडे उदा :– जोहार, आशीर्वादपत्र, अर्जदस्त इ.
ग) संसारातील व्यवहारी गोष्टी – वस्तू आणि नैतिक बाबींविषयक भारूडे उदा :– बाजार, रहाट, सासुरवास, नीती इ.

संत एकनाथांनी सुमारे १५० विषयांवर ३३४ च्या आसपास भारूडे लिहिली. अशा सर्वच भारूडांमधून तत्वज्ञान सांगितले आहे असे नाही त्यातील काही भारूडात सामाजिक प्रबोधन, समाजातील वाईट चालीरिती, प्रथा या रूढींविरूध्द लेखन केल्याचे जाणवते. काही निवडक भारूडांच्या आधारे व्यक्त होणारे समाजजीवन लक्षात घेता येईल. भारूडातून व्यक्त होणारे समाजजीवन हे विविधरंगी आहे. अध्यात्मबोध हे नाथांचे साध्य तर रंजन हे साधन होते. नाथांच्या काही भारूडांचे स्वरूप थोडक्यात लक्षात घेता येईल.

'बाळसंतोष' या भारूडात गावोगावी व घरोघरी भिक्षा मागणाऱ्या आणि आपल्या गीतांच्याद्वारे अध्यात्म प्रबोधन करणाऱ्या उपासकांपैकी एक बाळसंतोष हे देखील आहे. लहान मुलांची कपडे मागणाऱ्या या बाळसंतोषाचे आगमन सकाळच्या प्रहरी 'बाळसंतोष बाबा बाळसंतोष' असे म्हणत होत असे. यावेळी हा बाळसंतोष लहान मुलांचे व कृषिसंस्कृतीचे कथन करत असतो. संत एकनाथांचा बाळसंतोष वेगळा आहे.

" आम्ही परात्परा देशी। कोणी ओळखती आम्हासी।
टाकून आलो संतापाशी। बाळ संतोष.....
ऐक्यत्वाचे बिरडे जोशी। त्रिगुणासी कसली फेडी।
जुनी काचोळी रोकडी"

सतत भटकंती करणारा हा बाळसंतोष नाथांच्या भारूडात परात्परदेशी आहे. त्याला कोणी ओळखत नाही ऐक्यत्वाचे बिरडे, पूर्णत्वाची पुरणपोळी आणि प्रबोधनाचे लाडू तो मागत आहे.

पहाटेच्यावेळी स्त्री–पुरूष, लहान मुलांचे आपल्या बासरीने, वाणीने व नर्तनाने प्रसन्न करीत येणारा वासुदेव सर्वांना परिचित आहे. मोराच्या पिसाऱ्याची उंच टोपी घालून, लोंबता घोळदार

अंगरखा, हातात टाळ, गळ्यामध्ये माळ, पाया वाजवून अनेक देवांची नावे घेऊन 'दान पावलं' म्हणत फिरणारा वासुदेव आपण पाहिला आहे. सर्वांच्या कल्याणासाठी तो दान मागतो आणि ते मिळताच 'दान पावलं–दान पावलं' असे म्हणत फेर धरून नाचत बासरीचे मधुर सूर काढतो. ' हे विश्वची माझे घर। ऐसी मती जयाची स्थिर' या संत ज्ञानदेवांच्या मागणीप्रमाणे वासुदेवही या विश्वासाठी दान मागतो.

'धन्य जगी तोचि एक हरिंची नामे।
रामकृष्ण वासुदेव सदा स्मरे वाचे।
सुखदु:खसमान सकळ जीवांना कृपाळ।
ज्ञानाचा उद्बोध, भक्तीप्रेमाचा कल्लोळ''

विषयामध्ये विरक्त आणि आपपरभाव नसलेला, सर्व संसारात व्यापकत्वाने भरून राहिलेला, ज्ञान अज्ञानाच्या पलीकडे असणारा असा जो परमेश्वर आहे त्या हरीचे वासुदेव नित्य स्मरण करतो.

महाराष्ट्रात वाघ्या–मुरळी हे जेजुरीच्या खंडोबाचे भक्त आहेत. वाघ्यामुरळी जागरण करून खंडोबाच्या नावाने गीत व कथा वर्णन करतात. संत एकनाथ यांनी आपल्या भारूडाद्वारे स्वत:च वाघ्या होऊन भजन करण्याचा उपदेश केला आहे.

मल्हारीची वारी माझ्या। मल्हारीची वारी।
इच्छा मुरळीस पाहू नका
पडाल नरकाद्वारी
बोध बुधली, ज्ञान दिवटी
उजळा महाद्वारी

संत एकनाथ सांगतात की, मी वाघ्या तुम्हाला सांगतोय की, तुम्ही आजपर्यंत अज्ञानात खितपत पडलात त्यामुळे दु:खी झालात. त्यामुळे आता आमच्या जागरणात सामील व्हा. हया परमेश्वराचे जागरण मांडले आहे. ही भक्ती करताना जागरणातील मुरळीला भूलू नका कारण इच्छारूपी मुरळीमुळे तुम्ही भक्तीपासून दूर जाऊन तुम्हाला नरकवास भोगावा लागेल. संत एकनाथांनी स्वत: वाघ्या होऊन भक्तीचे जागरण मांडले आहे.

मानवी भूमिका दर्शवणाऱ्या महारीण, मांग, माळी या भारूडातूनही संत एकनाथांनी अधात्म्यासोबत सामाजिक प्रबोधन रूपकाच्या माध्यमातून सांगितले आहे. 'माळी' या भारूडात संत एकनाथ म्हणतात

हाती खुरपे घेतले विवेकाचे
समूळ मूळ खुरपणे वासनेचे
प्रत्यक्ष फळ लागले आत्मसाचे हो
एका जनार्दनी माळी जेथे नाचे हो

पीक जर चांगले यायचे असेल तर पिकांनी हानी करणारे तण काढून टाकावे लागते. हातात ज्ञानरूपी कुदळ घेऊन देहामध्ये वासनारूपाने नांदणारे तण काढून टाकतो. तण माजले की, पीक येत नाही त्याप्रमाणे देहरूपी जमिनीतून वासनारूपी तण काढल्याशिवाय शरीराची शुध्द होत नाही म्हणून या वनमाळीने ज्ञानरूपी कुदळीने वासनेचे विकार मुळासह उपटून टाकले आहेत.

शरीराने अपंग पण मनाने खंबीर असणाऱ्या आंधळा, पांगळा, बहिरा आणि मुका यांच्या व्यक्तीमत्वावर आधारित भारूडे रचली आहेत. स्वार्थासाठी आपल्या नवऱ्याला कुटूंबातून बाहेर काढणाऱ्या अनेक स्त्रिया असतात. परंतु आपल्या नवऱ्याला प्रापंचिक मोहातून बाहेर निघुन परमेश्वराच्या प्राप्तीचा प्रपंच करण्यास सांगणारी साधुवाशीण 'संसार' या भारूडात दिसते.

दादला, बायला, पोर अशी नातीगोती सांगणारी भारूडे एकनाथांनी लिहिली. 'दादला' या भारूडात संसारात तेवढीशी समाधानी नसणारी त्याग करून मुक्त होण्याचा विचार करते.

"मोडकेसे घर तुटकेसे छप्पर। देवाला देवघर नाही
मला दादला नलगे बाई।
फाटकेच लुगडे, तुटकीसी चोळी।
शिवाया दोरी नाही।
जोंधळयाची भाकर, अंबाडयाची भाजी
वर तेलाची धार नाही......
एका जनार्दनी समरस झाले।
ते रस येथे नाही।

अविद्येचे तुटकेसे छप्पर आहे. भावरूपी देवघर नसल्याची तक्रार पत्नी करते. तिचा नवरा अविचारी आहे. अविवेकी नवऱ्याच्या घरी खायला जोंधळयाची भाकर व अंबाडयाची भाजी मिळते. त्या भाजीवर स्नेहरूपी प्रेमाची धार नव्हती. परमेश्वराशी समरस होण्याचे सुख या प्रपंचात लाभत नाही. पारमार्थिक प्रपंचाची ओढ असलेली स्त्री या भारूडात दिसते.

विंचू, गाय, एडका, पोपट आदि पशु–पक्षीविषयक भारूडे संत एकनाथांनी लिहिली आहेत.

विंचू चावला। वृश्चिक चावला।
कामक्रोध विंचू चावला।
तम घाम अंगासी आला।
पंचप्राण व्याकूळ झाला।
त्याने माझा प्राण चालिला।
सर्वांगाचा दाह जाहला।

विंचू हे नाथांचे गाजलेले भारूड आहे. माणसाला विंचू चावला तर त्याच्या प्रचंड वेदना होतात तसाच कामक्रोधाचा विंचू जीवास चावला असता कशा वेदना होतात याचे वर्णन या भारूडात आहे. कामक्रोधाचा विंचू चावला तर त्यावर सात्विक गुणांचा उपाय महत्वाचा आहे. शिवाय परमेश्वराच्या भक्तीमुळेही दु:खे दूर होतात. सत्वगुणांचा अंगारा लावला की तमोगुणांचा नाश होतो.

जोहार–दरबारी पत्रे व दरबारी विषयावरील भारूडांमध्ये जोहार, आशीवार्दपत्र, अर्जदस्त आदि लिहिलेली आहेत. संत एकनाथांनी जवळपास ४० जोहार लिहिले. महार हा मध्ययुगीन ग्रामव्यवस्थेतील आणि बलुतेदारांमधील एक प्रमुख घटक आहे. गावागाडयाच्या कारभारात तो अतिशय प्रामाणिकपणा दाखवायचा. गावातील लहान मोठया घडामोडी, कुरबुरी, तक्रारी याची त्याला चांगली माहिती असायची. गावप्रमुखांना त्याची खूप मदत होत असे. रात्रंदिवस तो दरबारी–सरकारी कामे करायचा. गावातील पाटील, देशमुख, सुभेदार, शेटे, चौगुले, महाजन हे सारे गावाचा कारभार पाहायचे. शासनाचे नियंत्रण त्याकाळी नसल्याने गावाचा कारभार पाहणारा वर्ग हवे तसे वागायचा.

| Special Issue No.18 | विषय<br>संत साहित्याचे सामाजिक योगदान | ISSN 2349-638x<br>Impact Factor 4.574 |
|---|---|---|



ग्रामव्यवस्थेतील 'महार' याचे स्थान लक्षात घेऊन एकनाथांनी ४० च्या आसपास जोहार अनेकांना उद्देशून लिहिली आहेत. हे जोहार म्हणजे जीवास केलेला आध्यात्मिक उपदेशच आहेत. संत एकनाथ स्वत:ला 'संताघरचा महार', मी जनार्दनाचा महार, मी विठोबा पाटलाचा महार अशा विविध स्वरूपात आपली ओळख करून देण्याचा प्रयत्न करतात. गावच्या पाटलाला 'मनाजीपंत' ही ओळख देऊन त्यांना वासनेपासून दूर राहण्यास सांगितले आहे.

मी निर्गुण पुरीचा महार। करितो जोहार।<br>
पाटील बाबा तुमचे वस्तीत। पाटलीणीने केले बदमस्त।<br>
आता तुमचे नाही बरे। लक्ष चौऱ्यांशी फिराल फेरे।<br>
एका जनार्दनी महार। पायापाशी केला जोहार।

बहुजनांचे मनोरंजनातून प्रबोधन करण्यासाठी संत एकनाथांनी भारूड या वाङ्‌मय प्रकाराचा अवलंब केला. भारूडातील तत्वज्ञान हे रूपकात्मक पध्दतीने सांगितले आहे. विषयवासनेत अडकलेल्यांना नाथ उपदेश करतात. काम, क्रोध, मोह, मत्सर, द्वेष, लोभ, ममता, निंदा, चिंता, अहंकार आदि विकारांविषयी ते भारूडातून परखड बोलतात. श्रेष्ठ–कनिष्ठ, जातिभेद अशांवर मात करण्याचा ते प्रयत्न करतात. सामाजिक एकता निर्माण व्हावी हा त्यांचा प्रयत्न दिसतो. लोकभाषेचे व लोककलांचे माध्यम त्यांनी स्वीकारले त्यामुळे संत एकनाथांची भारूडे प्रभावी ठरली.